महावितरण
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित
(महाराष्ट्र शासन अंगीकृत)
CIN : U40109MH2005SGC153645
एस्ट्रेला बॅटरीज विस्तारीत इमारत, तळ मजला, प्लॉट नं.१, धारावी रोड,माटुंगा,मुंबई ४०० ०१९
email : agmhrom@gmail.com
दुरध्वनी क्रमांक : ०२२ - २४०७७४४१
website :www.mahadiscom.in
फॅक्स क्रमांक : ०२२ - २४०२५७६३

क्र. मासंवि/रवका/न.क्र.Covid-१९/ ९५५१ दिनांक : ०६.०५.२०२१

प्रति,

१) सह. व्यवस्थापकीय संचालक, म.रा.वि.वि.कं.मर्या. प्रादेशिक कार्यालय औरंगाबाद/ कल्याण.
२) प्रादेशिक संचालक, म.रा.वि.वि.कं.मर्या. प्रादेशिक कार्यालय पुणे/ नागपूर.
३) मुख्य अभियंता, म.रा.वि.वि.कं.मर्या. परिमंडळ कार्यालय (सर्व)

**विषय : दिव्यांगांकरीता कोवीड - १९ च्या व्यवस्थापनाबाबत राज्य शासनाच्या मार्गदर्शक सूचना.**

**संदर्भ :** १) परिपत्रक क्र.मासं/रवका/न.क्र.९/सीओव्हीआयडी/कोविड-१९-११/११४७६ दि.१७.०६.२०२०.
२) परिपत्रक क्र. मासं/रवका/न.क्र.९/सीओव्हीआयडी/कोविड-१९-४/कॅम्प/पुणे दि.२२.०४.२०२०.
३) शासन परिपत्रक क्र. .दिव्यांग-२०२१/प्र.क्र.३५/डीक-२ दि. ०३.०५.२०२१

कोविड - १९ चा प्रादुर्भाव रोखण्याकरीता शासनाकडून वेळोवेळी टाळेबंदी (Lockdown) ची मुदत वाढविण्यात आलेली आहे, आणि कोवीड-१९ च्या व्यवस्थापनाबाबत सूचना देखील निर्गमित करण्यात आलेल्या आहेत. सदरच्या सूचना कंपनी अंतर्गत अंगिकृत करण्यात आल्या असून, शासनाच्या धर्तीवर कंपनीकडून सर्व अधिकारी/कर्मचारी यांच्या कार्यालयीन उपस्थिती मर्यादित ठेवण्याबाबतच्या सूचना वेळोवळी निर्गमित करण्यात आलेल्या आहेत.

२. आता, महाराष्ट्र शासन, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, यांचे परिपत्रक क्र.दिव्यांग-२०२१/प्र.क्र.३५/डीक-२ दि. ०३.०५.२०२१ अन्वये, शासकीय कार्यालयातील दिव्यांग अधिकारी/कर्मचारी यांना उपस्थितीत सुट देण्याबाबतच्या सूचना पुढील आदेश निर्गमित होईपर्यंत पारित करण्यात आलेल्या आहेत.

३. सबब, दिव्यांग व्यक्तींना दैनंदीन प्रवासात येणा-या अडचणी व सर्व समान्यांच्या तुलनेत त्यांची रोगप्रतिकारशक्ती तितकीशी चांगली नसल्याने अडचणींचा सामना करावा लागतो व तो त्रासदायक ठरतो. या अनुषंगाने सक्षम अधिकारी यांनी कंपनीतील सर्व दिव्यांग कर्मचा-यांना कार्यालयात उपस्थित राहण्यापासून सुट देण्यास व त्यांना **"Work From Home"** ची मूभा कंपनीतील कार्यरत सर्व दिव्यांग अधिकारी व कर्मचारी यांचेकरीता खालील प्रमाणे लागू करण्याकरीता मंजुरी प्रदान केलेली आहे. तरी सदरच्या सूचनांचे कार्यालयांमध्ये काटेकोरपणे पालन होईल याची दक्षता घ्यावी.

क) परंतु सदर सुट्टी मुळे कंपनीच्या कार्यालयातील दैनंदीन कामकाजात अडचण येणार नाही याची दक्षता विभागीय सक्षम अधिकारी यांनी घ्यावी.

ख) **"Work From Home"** करीत असलेल्या कर्मचाऱ्यांनी आभासी माध्यम (VC), E-mail, What's App, इत्यादी आधुनिक माध्यमांचा वापर करुन कार्यालयीन कामकाजाकरिता संर्पकात रहावे.

च) सदरच्या सुचना उपरोकत शासन परिपत्रक दि. ०३.०५.२०२१ पासून शासनाच्या पुढील आदेश निर्गमित होईपर्यंत लागू राहतील.

३. सदर पत्र कंपनीच्या e-Library वर उपलब्ध करण्यात आलेले आहे.

**सोबत :** दि. ०३.०५.२०२१ रोजीचा शासन आदेश.

(कमांडर शिवाजी इंदलकर)(से.नि.)
मुख्य महाव्यवस्थापक (मासं)

**प्रत सविनय सादर :**

१) संचालक (वित्त)/ (संचलन)/ (वाणिज्य)/ (प्रकल्प)/ (मासं) म.रा.वि.वि.कं.मर्या., सांघिक कार्यालय, मुंबई-५१.
२) कार्यकारी संचालक (सुवअं)/ (वित्त)/ (देयके व महसूल) म.रा.वि.वि.कं.मर्या., सांघिक कार्यालय, मुंबई-५१.

**प्रत सस्नेह सादर :**

१) मुख्य महाव्यवस्थापक (तां/आ)/ मुख्य विधी अधिकारी, म.रा.वि.वि.कं.मर्या., सांघिक कार्यालय, मुंबई-५१.
२) मुख्य महाव्यवस्थापक (प्रवसु) म.रा.वि.वि.कं.मर्या., नाशिक.
३) मुख्य अभियंता (स्थापत्य), स्थापत्य परिमंडल, म.रा.वि.वि.कं.मर्या., मुंबई-५१.

**प्रत रवाना :**

१) महाव्यवस्थापक (मासं)/ (मासंव्यप्र)/ (नियोजन), म.रा.वि.वि.कं.मर्या., सांघिक कार्यालय, मुंबई-५१.
२) मुख्य औद्योगिक संबंध अधिकारी/ मुख्य जनसंपर्क अधिकारी, म.रा.वि.वि.कं.मर्या., सांघिक कार्यालय, मुंबई-५१.
३) मा. अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक यांचे विशेष कार्य अधिकारी, म.रा.वि.वि.कं.मर्या., सांघिक कार्यालय, मुंबई-५१.